**आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डांच्या उपयोगितेत आणखी उदारीकरण**
**जानेवारी ३०, २००३**

निवासी व्यक्ती व कंपन्या, आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डांची सुविधा भारतातील क्रेडिट कार्ड देणाऱ्या संस्थांकडून घेऊ शकतात. क्रेडिट कार्डे देणारी संस्था त्यांच्या पतधोरणाप्रमाणे पतमर्यादा ठवरेल.

निवासी व्यक्तींना चालू खात्यावरील विदेशी चलन वापरणे जास्त सुलभ व्हावे म्हणून आता असे ठरवण्यात आले आहे की, दर वर्षी यु एस डी. १०,००० व्यक्तिगत प्रवासासाठी आणि यु एस डॉ. २५,००० व्यापारी प्रवासासाठी, किंवा आंतरराष्ट्रीय संमेलन / शिक्षण / वैद्यकीय उपचार यांसाठी ही मर्यादा ओलांडण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेची पूर्वपरवानगी लागत होती, ती क्रेडिट कार्ड द्वारे केलेल्यां खर्चाला लागू होणार नाही. ही सुविधा क्रेडिट कार्ड देणाऱ्या संस्थेच्या पतमर्यादेप्रमाणे - सर्व निवासी व्यक्तींना लागू आहे.

येथे स्पष्ट करण्यात येत आहे, की रिझर्व्ह बँकेने विदेशी मुद्रा प्रबंधन अधिनियमाखाली क्रेडिट कार्डा द्वारे भारतात व भारताबाहेर होणाऱ्या खर्चावर वेगळी मर्यादा घातलेली नाही.

रिझर्व्ह बँकेच्या एपी (डी आय आर मालीका) परिपत्रक क्र. ५३ दि. जून २७, २००२ मधे जाहीर केल्याप्रमाणे विदेश प्रवासांसंबंधीच्या खर्चा शिवाय, आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डे इंटरनेटवर कुठल्याही अशा कारणासाठी वापरली जाऊ शकतात, की ज्यासाठी मान्यता प्राप्त विक्रेत्याकडून विदेशी चलन भारतात खरेदी करता येते : उदा. पुस्तकांची आयात डाऊनलोडेबल सॉफ्टवेअर्स किंवा एक्झिम पॉलिसी खालील परवानगी शिवाय कुठल्याही वस्तूच्या आयातीसाठी आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डा द्वारे इंटरनेटवरील खर्चावर कोणतीही वेगळी वित्तीय मर्यादा घातलेली नाही.

परंतु हेही स्पष्ट करण्यात येते की क्रेडिट कार्ड निषिद्ध वस्तूंची खरेदी उदा. लॉटरी तिकिटे, निर्बंधित वा निषिद्ध पुस्तके, स्वीपस्टेक मधे भाग, कॉलबॅक सेवा यांसाठी इंटरनेट किंवा इतरत्र वापरता येणार नाहीत कारण अशा वस्तू / सेवांसाठी विदेशी मुद्रा देण्यास परवानगी नाही.

**अल्पना किल्लावाला**
**महा व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००२-०३/८९१**